# // प्रेसनोट //

## दि. ०२/०८/२०२२

## दि. ०३/०८/२०२२ रोजीचे लसीकरण सत्र नियोजन

कोविड-१९ महामारीच्या प्रतिबंधासाठी दि. १६ जानेवारी २०२१ पासून संपूर्ण देशात व त्याअनुषंगाने राज्यशासनाच्या आदेशान्वये मिरा भाईंदर कार्यक्षेत्रात टप्पाटप्याने कोविड-१९ लसीकरण सत्रांचे नियोजन खालील तक्त्यात नमूद केल्यानुसार वयोगट निहाय करण्यात येत आहे.

आता पर्यंत १५ वर्षावरील नागरिकांचे प्रथम डोस / दुसरा डोस करीताचे तसेच आरोग्य कर्मचारी अग्रभागी कामकरणारे कर्मचारी व ६० वर्षावरील नागरिकांकरीता दुसरा डोस घेतल्या नंतर ९ महिने (३९ आठवडे) पूर्ण झाले असल्यास प्रिकॉशन डोस (बुस्टर डोस) करीताचे लसीकरण सुरु होते. परंतु, या पुढे १८ वर्षावरील नागरिकांचे दुसरा डोस घेऊन ६ महिने (२६ आठवडे) पूर्ण झाले असल्यास प्रिकॉशन डोस (बुस्टर डोस) करीताचे लसीकरण केले जाईल.

शासकीय कोविड लसीकरण केंद्रांच्या ठिकाणी आरोग्य कर्मचारी, अग्रभागी कामकरणारे कर्मचारी व ६० वर्षावरील नागरिकांकरीता व खाजगी कोविड लसीकरण केंद्राच्या ठिकाणी १८ वर्षावरील मधील नागरिकांकरीता शिक्षणासाठी परदेशी जाणारे विद्यार्थी, नोकरीकरीता परदेशी जाणारे व्यक्ती, समुद्री जहाजांवर काम करणारे भारतीय सीफेरर्स, परदेशी जाणरे खेळाडू, तसेच वैद्यकीय उपचाराकरीता परदेशी जाणाऱ्या नागरिकांना कोविड लसीचा दुसरा डोस घेऊन ३ महिने पूर्ण झालेले असल्यास प्रिकॅाशन डोस करीताचे लसीकरण देय राहील. लाभार्थ्यांना याकरीताचा अर्ज व संबंधित कागदपत्रे कोविड लसीकरण केंद्राच्या ठिकाणी सादर करणे आवश्यक राहील.

- तक्ता क्र. १ मधील अ.क्र. १,२,३,४ व ५ या लसीकरण केंद्राच्या ठिकाणी वय वर्ष १२ ते १४ वयोगाटातील लाभार्थ्यांकरीता (१५ मार्च २०१० आधी जन्म झालेले लाभार्थी) कोर्बोव्हॅक्स लसीचा पहिल्या व दुसऱ्या डोस करीताचे लसीकर णसत्र Online व Offline पद्धतीने आयोजित करण्यात येत आहे.
- तक्ता क्र. १ मधील अ.क्र. ६ ते १३ या लसीकरण केंद्राच्या ठिकाणी १८ वर्षावरील नागरिकांकरीता कोवॅक्सीन लसीच्या पहिला व दुसरा डोस तसेच आरोग्य कर्मचारी (HCW), अग्रभागी काम करणारे कर्मचारी (FLW) व १८ वर्षा वरील नागरिकांकरीता (Precaution Dose) बुस्टर डोसकरिताचे लसीकरण सत्र आयोजित करण्यात येत आहे.
- तक्ता क्र. १ मध्ये लसीकरणाची वेळ व डोसेस नमुद करण्यात आले आहेत.
- साप्ताहिक व सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी लसीकरण सत्र बंद राहतील. अत्यावश्यक प्रसंगी वरिष्ठांच्या आदेशान्वये लसीकरण सत्राचे नियोजन करण्यात येतील.
- लाभार्थ्यांना कोविन सिस्टिमवर स्वत:च्या मोबाईल नंबरव्दारे लसीकरणासाठी नोंदणी करता येईल. ऑनलाईन पध्दतीने लाभ घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांना दि.०२/०८/२०२२ रोजी संध्याकाळी ७.०० नंतर कोविन पोर्टलवर नोंदणी करता येईल. तसेच ऑफलाईन पध्दतीने लसीकरणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांना लसीकरण सत्राच्या दिवशी लसीकरण केंद्राच्या ठिकाणी (Onsite) जाऊन नोंदणी करण्याची सुविधा सुध्दा उपलब्ध राहील.
- लसीकरण केंद्रांच्या ठिकाणी प्राधान्याने मिरा भाईंदर शहरातील Offline पध्दतीने लसीकरणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांकरीता टोकन वाटप दि.०३/०८/२०२२ रोजी लसीकरणसत्राच्या वेळी केले जाईल.
- महानगरपालिकेच्या कर्मचारी व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नागरिकांनी टोकन वाटप करु नये तसेच कोणत्याही नागरिकांनी टोकन वाटप प्रक्रीयेत हस्तक्षेप करु नये अथवा बोगस टोकन वाटप करु नये.
- लससाठा उपलब्धतेनूसार पूढील लसीकरण सत्र आयोजीत करण्यात येतील.
- तरी मा. श्रीम. ज्योत्सना हसनाळे, महापौर, मिरा भाईंदर महानगरपालिका व मा. श्री. दिलीप ढोले, आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचे मार्फत मिरा भाईंदर शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, १२ ते १४ वयोगटातील लाभार्थ्यांचे लसीकरण त्याच बरोबर अध्यापही कोविड लसीकरणा पासून वंचित असलेल्या नागरीकांनी पहिला, दुसरा व प्रिकॉशन डोस करीताचे कोविड लसीकरण पूर्ण करुन घ्यावे.
- तसेच लसीकरण केंद्रांच्या ठिकाणी नागरिकांनी मास्क परिधान करुन तसेच सामाजिक अंतर (Social Distance) चे पालन करुन लसीकरण सुलभरित्या होणेस महानगरपालिकेस सहकार्य करावे.

- **टिप** :- १८ वर्षावरील नागरिकांकीरता कोविशील्ड व कोवॅक्सीन लसीचा प्रिकॉशन डोस दुसरा डोस घेऊन ६ महिने (२६ आठवडे) पूर्ण झाले असल्यास शासकीय कोविड लसीकरण केंदांच्या ठिकाणी उपलब्ध राहील.
- "कोविड लसीकरण अमृत महोत्सव" निमित्ताने जन अभियान अंतर्गत १८ वर्षावरील नागरिकांकीरता प्रिकॉशन डोस करिताचे लसीकरण दि. १५/०७/२०२२ ते दि.३०/०९/२०२२ पर्यंत शासकीय कोविड लसीकरण केंद्राच्या ठिकाणी मोफत उपलब्ध राहिल.

डॉ. नंदकिशोर लहाने
वैद्यकीय आरोग्य अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

D:\Vaccine\2022\PRESS NOTE\Aug\प्रेस नोट - 02.08.2022.docx

मिरा भाईंदर महानगरपालिका
वैद्यकीय विभाग
लसीकरण सत्र नियोजन - 03.08.2022
तक्ता क्र. 1

| अ.क्र. | कोविड लसीकरण केंद्राचे नाव | पत्ता | लसीचा प्रकार | एकूण डोसेस | लाभार्थी गट | वेळ | डोस | ऑनलाईन/ ऑफलाईन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पं. भिमसेन जोशी सामान्य रुग्णालय | मॅक्सस मॉल जवळ, १५० फूट रस्ता, भाईंदर (प) | कोर्बोव्हॅक्स | २०० | • वय वर्षे १२ ते १४ या वयोगाटातील लाभार्थ्यांकरीता कोर्बोव्हॅक्स लसीचा पहिला डोस व दुसरा डोस | सकाळी १०.०० ते संध्याकाळी ४.०० | पहिला डोस व दुसरा डोस | ऑनलाईन व ऑफलाईन |
| २ | स्व. मोरेश्वर पाटील भवन, प्रभाग क्र.३ | खारीगाव, तलाव रोड, वॉर्ड ऑफिस नंबर-३, भाईंदर (पूर्व) | कोर्बोव्हॅक्स | २०० | | | | |
| ३ | अप्पासाहेब धर्माधिकारी हॉल | सेवेन स्केवेयर शाळे जवळ, दीपक हॉस्पिटल रोड, मीरा रोड (पू) | कोर्बोव्हॅक्स | २०० | | | | |
| ४ | भा. इंदिरा गांधी रुग्णालय | पुनम सागर कॉम्पलेक्सच्या जवळ, मिरारोड (पुर्व) | कोर्बोव्हॅक्स | २०० | | | | |
| ५ | हैदरी चौक | वोक्हार्ट हॉस्पिटलच्या पुढे, हैदरी चौक मिरारोड (पू) मीरा रोड | कोर्बोव्हॅक्स | २०० | | | | |
| ६ | पं. भिमसेन जोशी सामान्य रुग्णालय | मॅक्सस मॉल जवळ, १५० फूट रस्ता, भाईंदर (प) | कोव्हॅक्सीन | २०० | • १८ वर्षावरील नागरिकांकरीता कोव्हॅक्सीन लसीचा पहिला व दुसरा डोस.<br>• आरोग्य कर्मचारी (HCW), अग्रभागी काम करणारे कर्मचारी(FLW), व ६० वर्षावरील नागरिकांकरीता कोव्हॅक्सीन लसीचा (Precaution Dose) बुस्टर डोस.<br>• सन २००७ व सन २००७ च्या आधी जन्म झालेल्या नागरीकांकरीता कोव्हॅक्सीन लसीचा पहिला व दुसरा डोस. | सकाळी १०.०० ते संध्याकाळी ४.०० | पहिला डोस व दुसरा डोस | ऑनलाईन व ऑफलाईन |
| ७ | स्व. मोरेश्वर पाटील भवन, प्रभाग क्र.३ | खारीगाव, तलाव रोड, वॉर्ड ऑफिस नंबर-३, भाईंदर (पूर्व) | कोव्हॅक्सीन | २०० | | | | |
| ८ | नवघर क्षयरोग केंद्र | हनुमान मंदिर, भाईंदर (पूर्व) | कोव्हॅक्सीन | २०० | | | | |

| अ.क्र. | कोविड लसीकरण केंद्राचे नाव | पत्ता | लसीचा प्रकार | एकूण डोसेस | लाभार्थी गट | वेळ | डोस | ऑनलाईन/ ऑफलाईन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | अप्पासाहेब धर्माधिकारी हॉल | सेवेन स्केवेयर शाळे जवळ, दीपक हॉस्पिटल रोड, मीरा रोड (पू) | कोव्हॅक्सीन | २०० | • १८ वर्षावरील नागरिकांकरीता कोव्हॅक्सीन लसीचा पहिला व दुसरा डोस.<br>• आरोग्य कर्मचारी (HCW), अग्रभागी काम करणारे कर्मचारी(FLW), व ६० वर्षावरील नागरिकांकरीता कोव्हॅक्सीन लसीचा (Precaution Dose) बुस्टर डोस.<br>• सन २००७ व सन २००७ च्या आधी जन्म झालेल्या नागरीकांकरीता कोव्हॅक्सीन लसीचा पहिला व दुसरा डोस. | सकाळी १०.०० ते संध्याकाळी ४.०० | पहिला डोस व दुसरा डोस | ऑनलाईन व ऑफलाईन |
| १० | हैदरी चौक | वोक्हार्ट हॉस्पिटलच्या पुढे, हैदरी चौक मिरारोड (पू) मीरा रोड | कोव्हॅक्सीन | २०० | | | | |
| ११ | पेणकरपाडा आरोग्य केंद्र | पेणकरपाडा महानगरपालिका शाळा, पेणकरपाडा | कोव्हॅक्सीन | २०० | | | | |
| १२ | काशीगाव आरोग्य केंद्र | काशीगाव महानगरपालिका शाळा, काशीगाव | कोव्हॅक्सीन | २०० | | | | |
| १३ | भा. इंदिरा गांधी रुग्णालय | पुनम सागर कॉम्पलेक्सच्या जवळ, मिरारोड (पुर्व) | कोव्हॅक्सीन | २०० | | | | |